स्थायी समितीच्या **शनिवार दिनांक 07–02–2015** रोजी **दुपारी 03–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 3. | सौ. सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 4. | सौ. भावना प्रशांत ढाकणे | सदस्या |
| 5. | श्री. हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 6. | सौ. सविता मनोज सांगोळे | सदस्या |
| 7. | श्री. सागर दामोधर लोखंडे | सदस्य |
| 8. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 9. | सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 10. | सौ. संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 11. | श्रीमती इशरद नाहीद मो. जलील अंसारी | सदस्या |
| 12. | सौ. सिंधु रामा उईके | सदस्या |
| 13. | सौ. रविंदर कौर बावा | सदस्या |
| 14. | श्री. देवा प्रसाद उसरे | सदस्य |
| 15. | श्री. प्रशांत रामराव धवड | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. दुनेश्वर सुर्यभानजी पेठे | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. अच्युत हांगे, अति. उप निगम आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 533</u>:– नागपूर महानगरपालिकेचे विविध विभाग व झोनल कार्यालयामध्ये असलेली मालमत्ता व इमारतीची देखरेख व सुरक्षा करण्याकरीता दोन वर्षाच्या कालावधी करीता शासनाचे किमान वेतन व इतर लागू असलेले भत्ते मिळून, खाजगी सुरक्षा एजेंसी कडून स्थायी समिती ठराव क्र. 81 दिं. 31.07.2014 अन्वये ई–निविदा बोलविण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने एकुण आठ ई–निविदा खालील प्रमाणे आठ एजन्सीव्दारे प्राप्त रू 11,583.10/– प्रति माह बिनाबंदुकधारी सुरक्षा गार्डचे दर पुढील दोन वर्षाकरीता मंजुर करण्याचा व स्थायी समिती ठराव क्र. 94 दिनांक 27.06. 2012 अन्वये कंत्राटाची मुदत दि. 31.08.2014 ला संपुष्टात आली असल्यामुळे नविन कार्यादेश होई पर्यंत जुन्या कंत्राटास मुदतवाढ देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन अनु. क्र. 1 ते 8 निविदाकारांनी 3 महिन्याचे आत पोलीस लायसन्स कार्यालयास सादर करतील या अटीवर, स्थायी समितीच्या सुचनेसह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. मे. सुपर सिक्युरीटी सर्विसेस, नागपूर

2. मे. वनश्री इन्टेलिजन्स सिक्युरीटी सर्विसेस.
3. मे. सिंग इंन्टेलिजन्स सिक्युरीटी प्रा. ली. मुंबई
4. मे. युनिटी सिक्युरीटी फोर्स ॲन्ड ट्रेनिंग इन्स्टीटयुट
5. मे. टायगर सिक्युरीटी फोर्स
6. मे. किशोर एजन्सीज
7. मे. ऑरेंजसिटी सिक्युरीटी सर्विसेस
8. मे. इंन्डस्ट्रीयल सिक्युरीटी सर्विसेस

ठराव क्रमांक 534:— मा. महापौर म.न.पा. नागपूर यांनी सुचविल्याप्रमाणे डेंग्यू रूग्णांची रक्त तपासणी ही म.न.पा. आरोग्य विभाग येथे उपलब्ध असलेल्या प्रयोग शाळेतून No Loss No Profit या तत्वार करण्यात यावी. त्यानुसार डेंग्यू रूग्णांच्या रक्त तपासणी किट ही प्रशासकीय मंजूरी खरेदी करून तपासणी करण्यात येत आहे. पण डेंग्यू रूग्णांच्या रक्त तपासणी दर हा आरोग्य विभाग येथे उपलब्ध असलेल्या दरसुचीमध्ये उपलब्ध नाही.

करीता डेंग्यू किट खरेदी दरावर डेंग्यू रूग्णांची रक्त तपासणी प्रशासकीय मंजुरीनुसार No Loss No Profit या तत्वावर डेंग्यु रूग्ण रक्त तपासणी दर हा रू. 350/— हा ठरविण्यात सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 535 :— अंबाझरी तलावात तिन वर्ष कालावधीकरीता मत्स्यव्यवसाय करण्यास्तव निविदा बोलविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 536:— मौजा हुडकेश्वर (बु.) व नरसाळा येथे पाणीपुरवठा वितरण प्रणालीचे बळकटीकरण करणे व विंधन विहीरी खोदणे चे रू. 6,73,92,247/— चे कामास राज्य शासन निणर्य क्र. बीईसी—1915/प्र.क्र.7/ नवि—4, दिनांक 8 जानेवारी 2015 अन्वये उपरोक्त कामाच्या रक्कमेपैकी 20 टक्के रक्कम नागपूर महानगरपालिकेने अंशदान देण्यासंबंधीचा ठराव नागपूर महानगरपालिकेच्या महासभेच्या आगामी बैठकीत संमत करून घेण्याचा अटीच्या अधिन राहून मंजूरी प्राप्त झालेली आहे.

या संदर्भात खाली नमूद प्रस्ताव मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन तसेच,

मौजा हुडकेश्वर (बु.) व नरसाळा येथे पाणीपुरवठा प्रणालीचे बळकटीकरण करणे व विंधन विहीरी खोदणे या कामाचे प्रशासकीय मंजूर राशी रू. 6,73,92,247/— चे 20 टक्के रक्कम रू. 1,34,75,449/— नागपूर महानगरपालिकेकडून अंशदान म्हणून खर्च करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 537:— **म.न.पा. च्या विविध विभागांना संगणक ऑपरेटर्सचा पुरवठा करण्याबाबत.**

1. नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभागांना अंदाजे 100 संगणक ऑपरेटर्सची आवश्यकता आहे. कंत्राटदारा मार्फत या ऑपरेटर्सची सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी Minimum Wages Act मधील दुकाने व आस्थापना यांचे न्युनतम दर रू. 9,954/— प्रति माह प्रति ऑपरेटर याप्रमाणे प्रस्ताव तयार करण्यात आला. हा प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविण्यात आला. स्थायी समिती ठराव क्रं. 100, दिनांक 07/08/2012 अन्वये त्यास मंजुरी प्राप्त झाली. या ठरावा अन्वये निविदा काढण्याची मंजुरी प्राप्त झाली.

2. परंतु हे दर जास्त वाटल्यामुळे मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार हा ठराव कार्यान्वित झाला नाही व महाराष्ट्र शासनाच्या जी. आर. क्रं. रोहयो/2011/प्र.क्रं./23/रोहयो–09, मुंबई, दिनांक 08/12/2011 नुसार रू. 6000/– प्रति ऑपरेटर प्रति माह या दराने मंजुरीसाठी प्रस्ताव स्थायी समितीकडे परत पाठविण्यात आला. तसेच आधीच्या कामाची मुदत संपल्यामुळे व काम सुरू ठेवणे आवश्यक असल्यामुळे मा. आयुक्त यांनी तात्पुरत्या स्वरूपात हे काम करण्यास पुढील निर्णय येई पर्यंत मंजुरी प्रदान केली. त्यानुसार रू. 6000/– प्रति माह या नुसार मा. आयुक्त यांची मंजुरी घेऊन भुगतान करण्यात आले.
3. रू. 6000/– चा हा प्रस्ताव स्थायी समिती व्दारे ठराव क्रं. 197, दिनांक 26/12/2013 अन्वये नामंजुर करण्यात आला व आधीच्या ठराव क्रं. 100 ला दिलेली मंजुरी कायम ठेवण्यात आली. ठराव क्रं. 197, हा दिनांक 13/2/2013 रोजी कार्यान्वित झाला.
4. त्यानुसार या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या. एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या. त्यात पात्र चार निविदा दिनांक 03/04/2013 रोजी उघडण्यात आल्या. त्यापैकी 1st Perferred Bidder, M/s. J & J Consultancy Services, Nagpur यांचेशी वेळोवेळी वाटाघाटी झाल्या. वाटाघाटी नुसार रू. 11,271/– प्रति संगणक ऑपरेटर प्रति माह हे दर प्राप्त झाले. हे दर मान्यतेसाठी मा. आयुक्त यांच्याकडे सादर करण्यात आले.
5. दरम्यान मा. अप्पर आयुक्त व मा. आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चेनुसार शासनाचे परिपत्रक क्रं. शासन नियोजन विभाग, शासन निर्णय क्रं. कंत्राटी–2013/प्र.क्रं.2/मग्रारो 3, दिनांक 01/06/2013 नुसार मानधनात रू. 1000/– ची वाढ झाल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील सेतू मार्फत संगणक ऑपरेटर घेण्याचा रू. 7000/– चा प्रस्ताव स्थायी समितीकडे ठेवण्याचे निर्देश प्राप्त झाले.
6. रू. 7000/– चा प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविला असता, स्थायी समितीने परत त्यास . ठराव क्रं. 86, दिनांक 12/07/2013 अन्वये नामंजुर केले.
7. त्यानंतर झालेल्या चर्चेनुसार मा. आयुक्त यांनी ठराव क्रं. 86, मधील उल्लेखित ठराव क्रं. 197 चा भाग महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 451 अंतर्गत विखंडीत करून ठरावा मध्ये अमान्य केलेल्या रू. 7000/– प्रति माह या दरास मंजुरी देण्यास महाराष्ट्र शासनाकडे पत्र पाठविण्याचे निर्देश दिले. त्यानुसार महाराष्ट्र शासनाकडे पत्र पाठविण्यात आले. परंतु महाराष्ट्र शासनाकडून त्यावर कुठलाही निर्णय प्राप्त न झाल्यामुळे, शासनाला दोनदा स्मरणपत्रे व अर्धशासकिय पत्र पाठविण्यात आले. परंतु महानगरपालिकेस महाराष्ट्र शासनातर्फे कुठलाही निर्णय प्राप्त झाला नाही.
8. दरम्यान महाराष्ट्र शासनाच्या दरात वाढ होऊन ते एकूण रू. 8000/– प्रति माह इतके झाले. त्यानुसार तात्पुरत्या कामास मा. आयुक्त यांची मंजुरी घेऊन रू. 8000/– प्रमाणे दिनांक 01/08/2014 पासून भुगतान करण्यात आले.
9. महाराष्ट्र शासनाकडून कुठल्याही प्रकारचा निर्णय प्राप्त न झाल्यामुळे, वेळोवेळी झालेल्या चर्चेनुसार निविदा व तात्परुत्या कामाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव स्थायी समितीला सादर करण्यात येत आहे.

अ) तात्पुरत्या कामास दिनांक 01/12/2012, ते 28/02/2013, 03 महिने करिता रू. (6000 + सेवा कर) यानुसार 20,63,052/–,दिनांक 01/03/2013 ते 31/07/2014, 17 महिने यानुसार रू. 1,14,61400/–, दिनांक 01/08/2014 ते 31/01/2014, 06 महिने रू. (8000 + सेवा कर) यानुसार रू. 53,93,400/– असे एकूण रू. 1,89,17,825/– च्या तात्पुरत्या कामावर खर्च झालेला आहे. या तात्पुरत्या कामास व खर्चास मंजुरी प्रदान करणे. तसेच नविन कार्यादेश होईपर्यंत या तात्पुरत्या कामास मुदत वाढ देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ब) सध्याचे Minimum Wages च्या दरानुसार निश्चित केलेल्या रूपये 12,009/– प्रति संगणक ऑपरेटर, प्रति माह या दरावर एकूण 100 संगणक ऑपरेटर्स पूरविण्यासाठी निविदाकार M/s. J & J Consultancy Services, Nagpur यांना मंजुरी प्रदान करणे. कंत्राटाचा कालावधी एक वर्षाचा राहील. या दरानुसार एक वर्षासाठी रू. 1,44,10,800/– च्या अपेक्षीत खर्चास मंजुरी प्रदान करणे. कंत्राटाच्या कालावधीत महाराष्ट्र शासनाच्या Minimum Wages च्या दरात जे बदल होतील, त्यानुसार कंत्राटदाराला देय असलेल्या दरात बदल करण्यात येईल. कंत्राटाच्या कालावधीत, दरात बदल करून दर निश्चित करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना राहतील. कंत्राटदाराचे Overhead Charges, नफा, आयकर, ईत्यादी; किमान वेतनाच्या (मुळ वेतन दर अधिक विशेष भत्ता) 15% प्रति ऑपरेटर प्रति माह एवढे असुन या दरातच समाविष्ट राहील.

उपरोक्त प्रस्ताव (अ) व (ब) मंजुर करण्याचा तसेच नविन कार्यादेश होईपर्यंत तात्पुरत्या कामास मंजुरी व मुदत वाढ देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन नविन कामास तिन वर्षाच्या कालावधीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 538</u> :— प्रभाग क्र. 14 अ, येथील प्रस्तावित नामदेवनगर उद्यानातील विविध विकास कामे करण्याअंतर्गत कामनिहाय प्राप्त खालीलप्रमाणे निम्नतम निविदा एकत्रित राशी रु. 36,09,447/— मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| अ.क्र. | कामाचे नाव | निम्नतम निविदाकार | निविदा दर | राशी |
|---|---|---|---|---|
| 1. | विविध स्थापत्य कामे (ड्रेन लाईन इत्यादी) | मे. शिवशंकर गो. घोराडकर | प्राकलनीय दर | रु. 4,92,780/— |
| 2. | हिरवळीची कामे | मे. श्री. हिमालया प्लाटेंशन | 4.5 % कमी | रु. 25,41,035/ |
| 3. | तुषार सिंचन व्यवस्था | मे. कृषीमित्र इरि. सर्व्हिसेस | 1.9 % कमी | रु. 5,72,632/— |
| | | | **एकूण रुपये :—** | **रु. 36,09,447/—** |

<u>ठराव क्रमांक 539</u> :— पद क्र. झिंगाबाई टाकळी, मानकापूर येथे सिंगल सिटेड संडास बनविण्याकरीता ठेवण्यात आलेल्या प्रावधानातुन रू. 1 लक्ष पद क्रमांक 676 वळते करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन सुधारीत अर्थसंकल्पात समाविष्ट करण्याच्या सुचनेसह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 540</u> :— मंगळवारी झोन मंजुर झोनल बजेट 2014—2015 मध्ये पद क्र. 716 (A4/23/501/707/04) विद्युत खांबावर एल.ई.डी. दिन्याचे कंट्रोलर लावणे करीता ठेवण्यात आलेली तरतुद रू. 26.50 विविध पदाअंतर्गत वळती करून मा. सदस्याचे प्रभाग निहाय वाटप करण्याचा प्रश्न विचारात घेणे. तसेच झोनकरीता राखीव तरतूद व पद क्र. 561 मध्ये वाचनालयाची इमारत निर्मीती करीत ठेवण्यात आलेला 3.50 ही तरतुद पद 613 भुमिगत नाली या पदाअंतर्गत वळती करण्यास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचाारात घेणे. तसेच मा. सदस्या श्रीमती भावना लोणारे यांनी केलेल्या प्रभाग समितीच्या सभेमध्ये केलेल्या दुरूस्तीच्या सुचनेनुसार प्रभाग क्र. 6 अ करीता पद क्र. 620 निर्मल शहर योजना या ठेवलेली प्रावधान राशी 8.50 लक्ष राशीमधुन पद क्र. 676 रस्त्याचे निर्माण यामध्ये 3.50 लाख वळतीकरण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन सुधारीत अर्थसंकल्पात समाविष्ट करण्याच्या सुचनेसह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| पद क्र. | ठेवण्यात आलेली तरतुद | वळती करण्यात येणारे पद क्र. | तरतुद |
|---|---|---|---|
| 716 (A4/23/501/707/04) विद्युत खांबावर एल.ई.डी. दिव्याचे कंट्रोलर लावणे | 26.50 | 676/A4/20/501/705/03 | 14.50 |
| 620(A4/39/501/719/06) निर्मल शहर योजना | 8.50 | 620/A4/39/501/719/06 | 8.00 |
| 561 (A4/56/501/729/09) वाचनालय इमारत निर्मीती | 3.50 | 613/A4/39/501/308/13 | 11.00 |
| | **38.50** | | **33.50** |

<u>ठराव क्रमांक 541</u> :— महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉट विभागाद्वारे नागपूर शहरातील रस्त्याची दूरुस्ती व सूस्थिती करण्याकरीता लेबर पुरवठा करण्याकरीता मे.

आर.बी. केवलरमानी यांची प्राकलनिय दरापेक्षा 13.00 टक्के अधिक दराची ( Current CSR 2014-15 पेक्षा 3% कमी दराची ) रु. 39,53,121.00 राशीची निविदा स्विकृत करुन निविदेस मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 542:— प्रभाग क्र. 34 येथे सोनबा नगर व भरत नगर येथे सि.सी. रोडचे काम करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. बजोरीया ईन्टरप्राईजेस यांची प्राकलनीय दरापेक्षा 14.99 टक्के कमी दराची रु. 25,49,488/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 543:— प्रभाग क्र. 38 अ अंतर्गत गरोबा मैदान, कब्रस्तान भागात सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकामास्तव प्राप्त निविदापैकी मे. मुकेश कन्स्ट्रक्शन, नागपूर यांची प्राकलनीय दरापेक्षा 11.51 टक्के कमी दराची रू. 33,15,223/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 544:— नागपूर महानगपालिके तर्फे "महापौर चषक" अखिल भारतीय खो—खो स्पर्धेचे (पुरूष/महिला) आयोजन दिनांक 19 फेब्रु. ते 22 फेब्रु. 2015 या कालावधीत "रा.पै.समर्थ स्टेडियम" येथील मैदानावर आयोजित आहे. या स्पर्धेकरीता प्राकलन नुसार रू. 27,91,250/— खर्च अपेक्षित आहे. यास प्रशासकीय तथा वित्तीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

हा खर्च पद क्र. (476) A26502242211 मधून करण्यात येईल.

ठराव क्रमांक 545:— नागपूर महानगपालिके तर्फे "महापौर चषक" अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेचे (पुरूष/महिला) आयोजन दिनांक 12 फेब्रु. ते 15 फेब्रु. 2015 या कालावधीत "रा.पै.समर्थ स्टेडियम" येथील मैदानावर आयोजित आहे. या स्पर्धेकरीता प्राकलन नुसार रू. 31,47,000/— खर्च अपेक्षित आहे. यास प्रशासकीय तथा वित्तीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

हा खर्च पद क्र. (476) A26502242211 मधून करण्यात येईल.

ठराव क्रमांक 546 :— प्रभाग क्र. 13 अ आणि ब येथील सुजाता नगर, आनंद नगर बिनाकी येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त 3 निविदा पैकी मे. मुकेश कन्स्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा 6.25 प्रतिशतने अधिक दराची रु. 31,87,132/— (एकतीस लक्ष सत्यांशी हजार एकशे बत्तीस रुपये फक्त) रकमेची सुधारीत निविदा, कामाचा खर्च मुळ प्राकलनीय राशी रु. 29,99,960/— पर्यंत सिमीत राहील या अटीवर स्विकृत करण्याबाबत यथोयोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 547 :— प्रभाग क्र. 30 ब मधील बाजीराव मोहल्ला, कोलबास्वामी मठ, देवधरपूरा जागनाथ बुधवारी भागातील रस्त्यांचे सिमेंटीकरण करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रू. 44,99,322/— (अक्षरी चौरेचाळीस लक्ष नव्याण्णव हजार तिनशे बावीस रूपये) रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र. 681 व नविन पद क्र. A22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 548</u> :— प्रभाग क्र. 56 बी अंतर्गत आरे मिल्क केन्द्र ते विश्राम नगर नाला रिंग रोड येथील रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 4996522/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. 681 (A22001330802) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 549</u> प्रभाग क्र. 56 बी अंतर्गत बाबागीरी चुनाभट्टी ते जुनी अजनी, आजाद चौक येथील रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 4937034/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. 681 (A22001330802) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 550</u> प्रभाग क्र. 56 'अ' अंतर्गत छत्रपतीनगर येथील रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 49,96,090/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. 681 (A22001330802) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 551</u> प्रभाग क्र. 57 ब अंतर्गत सुंदरबन भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 3123144/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. 370 (A22001330801) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 552</u> प्रभाग क्र. 27, गांधीसागर मधील आग्याराम देवी चौक ते गणेश घाट पर्यन्त, सुभाष रोडचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 62,46,645/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. 682 (A22001330803) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 553</u> प्रभाग क्र. 51 ब अंतर्गत धंतोली येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 4999592/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. 682 (A22001330803) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 554</u>:— प्रभाग क्र. 57 मधील गुप्ता हार्डवेअर ते कन्टेनर डेपो, सुयोग नगर पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेणे. हे काम पद क्र. 370 (A22001330801) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी रु. 4589980/— लक्ष पर्यंत सिमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 555</u>:— प्रभाग क्र. 66 (ब) अंतर्गत रामेश्वरी येथील हावरापेठ भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रु. 37,17,120 रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. 681 (A22001330801) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 556</u>:— प्रभाग क्र. 69 अंतर्गत खामला मेन रोड ते पांडे ले–आऊट पर्यंत रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रु. 25,99,245 रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. (A22001330802) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 557</u> :— महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 20(3) अन्वये स्थायी समितीचे 8 खालील सदस्य दिनांक 01/03/2015 रोजी दुपारनंतर निवृत्त करण्याचा प्रश्न विचारात घेवून महासभे समक्ष सादर करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1) श्रीमती पल्लवी अशोक शामकुळे – नागपूर विकास आघाडी
2) सौ. सुषमा संजय चौधरी – नागपूर विकास आघाडी
3) सौ. भावना प्रशांत ढाकणे – नागपूर विकास आघाडी
4) श्री. हरीश सिताराम डिकोंडवार – नागपूर विकास आघाडी
5) सौ. सविता मनोज सांगोळे – नागपूर विकास आघाडी
6) श्री. सागर लोखंडे – बहुजन समाजपार्टी
7) श्री. दुनेश्वर सुर्यभान पेठे – राष्ट्रवादी कॉंग्रेस
8) श्री. सुरेश दामोधर तळवेकर – शिवसेना

<u>ठराव क्रमांक 558</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर